सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.H.D-42014/1/2025-ACS-MHD-Home Department,दि.२९ मे,२०२५

**विषय** :- बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय दलातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी डीजीटल स्मार्ट ओळखपत्र करण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.H.D-42014/1/2025-ACS-MHD-Home Department, दि.२९ मे,२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०५२९१४५१०८५३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 02-06-2025 10:28:16

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
कार्यासन अधिकारी ,का.क्र.६

प्रत:-
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत,
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “ आस्थापना“ या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय दलातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी डीजीटल स्मार्ट ओळखपत्र करण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः H.D.-42014/1/2025-ACS-MHD-Home Department**

दुसरा मजला, मंत्रालय मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
तारीख: २९ मे, २०२५

**वाचा :-**

**पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे पत्र क्रमांकः** पोआ/कक्ष-४(ना.आ.)/४(४)/ ओळखपत्र/५३/२०२५, दिनांक ०८ मे, २०२५

**प्रस्तावना :-**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व प्रादेशिक विभाग/ घटक कार्यालये/ शाखा येथे कार्यरत असलेले पोलीस अधिकारी/ कर्मचारी/ अंमलदार हे सद्यःस्थितीत छापील ओळखपत्र वापरतात. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची सुमारे ५१,३०८ पदे मंजूर आहेत. या पोलीस अधिकारी अंमलदार यांना कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी तसेच दैनंदिन कामकाजाच्या वेळी ओळखपत्राचा वापर करावा लागतो.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले पोलीस अधिकारी/ अंमलदार हे सध्या वापरत असलेल्या छापील ओळखपत्राची कोणत्याही डी.टी.पी. च्या सहाय्याने नक्कल होऊ शकते. तसेच समाजकंटकांमार्फत या ओळखपत्राची नक्कल करुन सामान्य नागरिकांची फसवणूक होण्याची प्रकरणे निदर्शनास येत आहेत. ऑनलाईन माध्यमांद्वारे बनावट ओळखपत्राचा वापर करुन डीजीटल अरेस्ट सारख्या घटनांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

अशा प्रकारच्या गुन्हेगारी प्रकरणांना आळा घालण्यासाठी पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्याकरिता तंत्रज्ञानयुक्त स्मार्ट कार्ड पुरविणे आवश्यक झाले आहे.

कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने मुंबई या शहराचा गांभिर्याने विचार करता, पोलीस यंत्रणेसाठी Digital Smart Card सारख्या ओळखपत्राच्या दिशेने पाऊल उचलने महत्वाचे झाले असून अशा स्वरुपाची सेवा देणारे बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय हे पहिले शासकीय कार्यालय ठरेल. या सर्व

बाबींचा विचार करता, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/ कर्मचारी/ अंमलदार यांच्याकरिता डीजीटल स्मार्ट ओळखपत्र खरेदी करण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास केलेल्या विनंतीस अनुसरुन बनावट ओळखपत्राच्या आधारे गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी, सामान्य जनतेचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास दृढ होण्यासाठी, राष्ट्रीय व राज्याच्या सुरक्षेला हानी पोहचू न देण्यासाठी, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व प्रादेशिक विभाग/ घटक कार्यालये/ शाखा येथे कार्यरत असलेले पोलीस अधिकारी/ कर्मचारी/ अंमलदार यांच्याकरिता तंत्रज्ञानयुक्त स्मार्ट ओळखपत्र तयार करण्याकरिता रक्कम रुपये ४.०० कोटी (अक्षरी चार कोटी फक्त) एवढ्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे :-

**वरील बाबींसाठी देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता ही पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-**

१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाकरिता डीजीटल स्मार्ट ओळखपत्र तयार करण्यासाठी देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता ही उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत देण्यात येत आहे. त्यामुळे कामाचे प्रत्यक्ष प्रकल्पांतर्गत कार्यादेश देखील निधीची उपलब्धता झाल्यानंतरच देण्यात यावेत.

२) राज्य शासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार व निर्देशांनुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नविन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करु नये.

४) प्रशासकीय मान्यतेनुसार डीजीटल स्मार्ट ओळखपत्र तयार करण्याची अंमलबजावणी करताना दर्जा व गुणवत्ता उत्कृष्ठ राहील याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.

५) सदर प्रकल्पाकरिता कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, अतिरिक्त खर्च करता येणार नाही.

६) प्रकल्पांतर्गत सामुग्रीची आवश्यकता/ मागणी याची अंमलबजावणी यंत्रणेने खातरजमा करावी व तदनंतरच या बाबींच्या खरेदीसाठी आवश्यक ती प्रक्रिया राबविण्यात यावी.

७) या सामुग्रीचे विनिर्देश (Specifications) गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खात्री करण्यात यावी.

८) खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specifications) तज्ज्ञांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसारच असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होतील, अशा रीतीने नसल्याची खात्री करावी व त्यानंतरच खरेदी करण्यात यावी.

९) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठ्याअगोदर व पुरवठ्यानंतर नमुना तपासणी (Pre/ Post-dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

१०) प्रकल्पांतर्गत सामुग्रीच्या खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

११) या प्रकल्पांतर्गत उपलब्ध करुन देणाऱ्या निधीच्या विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी शासनास सादर करावे.

१२) प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र (Completion Certificate) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी शासनास त्वरित उपलब्ध करुन द्यावे

१३) तंत्रज्ञानयुक्त स्मार्ट ओळखपत्र बनविण्यासाठी येणारा खर्च हा अनावर्ती स्वरुपाचा असेल.

१४) सदर तंत्रज्ञानयुक्त ओळखपत्र तयार करताना गोपनीयता बाळगणे अनिवार्य असल्याने तसेच सदर ओळखपत्र तयार करताना वेगवेगळ्या माध्यमांद्वारे काम करण्यात येणार असल्याने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या स्तरावर Closed Tendering ची प्रक्रिया राबविण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१५) या नविन ओळखपत्राचा कोणत्याही प्रकारे गैरवापर होणार नाही, याची दक्षता घेणे बंधनकारक राहील. या ओळखपत्राचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत अधिकारी/ कर्मचारी/ अंमलदार हे शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र राहतील.

या प्रयोजनासाठी येणारा खर्च हा "गृह विभाग- मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस १०८- राज्य मुख्यालय पोलीस, (०२) शहर पोलीस (०२) (०१) आस्थापना, दत्तमत (२०५५००९७) अंतर्गत उद्दिष्टे "१३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय हा वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, अनु क्रमांक २९, नियम क्रमांक ७९ (शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-

२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, मंत्रालय, मुंबई दिनांक १७/०४/२०१५) अन्वये तातडीच्या व निकडीच्या प्रकरणी मुद्रणाचे काम करण्याबाबत विभागास असलेल्या संपूर्ण अधिकारांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०५२९१४५१०८५३२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2025.05.29 14:52:15 +05'30'

**(चेतन निकम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, गृह, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
५. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र (मुंबई/ नागपूर)
६. उप सचिव (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७. उप सचिव (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (कार्यासन पोल-७)